दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : १३८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.३० डिसेंबर २०२४




## नागपूरात ५ दिवसांपासून दररोज एक हत्याकांड!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, नागपूर :** गेल्या काही महिन्यांपासून उपराजधानीतील गुन्हेगारी वाढली असून पोलिसांचा वचक संपला आहे. गुन्हेगाराने तोंड वर काढले असून गेल्या पाच दिवसांपासून दररोज एक हत्याकांड शहरात घडत आहे. गेल्या पाच दिवसांत पाच हत्याकांडाच्या घटना उघडकीस आल्यामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडल्याचे चित्र समोर आले आहे. रविवारीसुद्धा जरीपटक्यातील ख्रिश्चन कबरस्थानात हत्याकांड घडले. रमेश शेंडे असे खून झालेल्या चौकीदाराचे नाव आहे. यापूर्वी, शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास तिघांनी एकाचा चाकूने भोसकून खून करुन धंतोलीसारख्या गजबजलेल्या रस्त्यावर फेकून पळ काढला.

पोलिसांना अद्याप मृताची ओळख पटविण्यात यश आले नाही. तसेच अजनीत बापलेकाचा खून झाला होता तर शुक्रवारी कुलदीप चव्हाण नावाच्या युवकाचा मित्रानेच खून केला होता. तसेच दोन दिवसांपूर्वी यशोधरानगरमध्ये वहिणीशी अनैतिक संबंध ठेवणाऱ्या मित्राचाही राजा नावाच्या युवकाने खून केल्याची घटना समोर आली होती. शहरातील हत्याकांडाचे सत्र वाढतच असून सरत्या वर्षाच्या शेवटच्या आठवड्यातही पाच खुनांनी उपराजधानी हादरली. गेल्या पाच दिवसांत शहरात पाचवे हत्याकांड घडले. रविवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास एक युवक हातात चाकू घेऊन जरीपटक्यातील भारतीय प्रोटेस्टंट ख्रिचन कबरस्थान येथे आला. तेथील चौकीदार रमेश शेंडे याच्या दिशेने धावत गेला. त्याचा हात पकडून काहीतरी विचारणा केली. त्यानंतर चाकूने रमेश यांच्यावर




वार केले. त्यावेळी कबरस्थानात अंत्यविधीसाठी आलेला युवक जेकब किरण यांनी धावत जाऊन त्या युवकाला पकडले.

तोपर्यंत रमेश शेंडे हे रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. काही नागरिकांनी रमेश यांना रुग्णालयात पोहचवले तर आरोपीला किरण यांनी घट्ट पकडून ठेवले. आरोपी पळून जाण्यासाठी झटापट करीत असतानाच किरण यांनी जरीपटका पोलिसांना फोन केला. हत्याकांडाबाबत माहिती दिली. काही वेळातच जरपीटकचे पोलीस निरीक्षक संजय सिंग तेथे पोहचले. त्यांनी लगेच आरोपीला ताब्यात घेतले. घटनास्थळ पंचनामा करुन हत्याकांडाचा गुन्हा दाखल केला.

**धंतोली हत्याकांडातील आरोपींना अटक**

शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास हंपी यार्ड रोडवरील लोहारकर हॉटेलच्या समोर एका ऑटोने आलेल्या तीन आरोपींनी एका युवकावर चाकूने वार करीत गंभीर जखमी केले. ऑटोतून त्याला रस्त्यावर फेकले आणि पळ काढला.

तासाभरानंतर पोलिसांना हत्याकांडाची माहिती मिळाली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला. मृतकाची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला. हे हत्याकांड सीसीटीव्हीमध्ये कैद झाले आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज जप्त केले असून आरोपींची ओळख पटविली. त्या ऑटोची माहिती पोलिसांनी काढली. या हत्याकांडातील तीनही आरोपींना गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली.

## 'अक्षराज दिनदर्शिका २०२५' प्रकाशन सोहळा नवी मुंबईत संपन्न




**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२९, नवी मुंबई :** अल्पावधीतच सामान्यांचा बुलंद आवाज बनलेला, महाराष्ट्रातील निर्भीड वृत्तपत्र दैनिक अक्षराज मीडियाची अक्षराज दिनदर्शिका २०२५ प्रकाशन सोहळा रविवार दि.२९ डिसेंबर २०२४ रोजी, नवी मुंबईतील साई पार्टी हॉल बी १०८, अनमोल प्लाझा,प्लॉट नं.७, सेक्टर ८, खारघर, नवी मुंबई येथे अक्षराज मीडियाचे संपादक विनोद गोरे, नवी मुंबई ठाणे जिल्हा प्रतिनिधी जे.के. पोळ, महादेव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला, सदर कार्यक्रमाला मुंबई, ठाणे, नवी मुंबई व रायगड तसेच पालघर विभागाचे प्रतिनिधी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रसंगी कोकण विभागाची मुंबई, ठाणे, नवी मुंबई व रायगड तसेच पालघर प्रतिनिधी, पत्रकार यांची बैठक पार पडली, बैठकीत अक्षराज दिनदर्शिका २०२५ प्रकशित करून वाटप करण्यात आली.

तसेच नवीन वर्ष २०२५ च्या कामकाजाविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. दैनिक अक्षराज महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात पोहचले असून, जनतेचे अनेक समस्यांवर दैनिक अक्षराज मीडियाने प्रभावी काम केले असून भविष्यातही अक्षराज मीडिया निर्भीडपणे काम करणार असल्याचे संपादक विनोद गोरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. प्रसंगी त्यांनी अक्षराज दिनदर्शिका २०२५ प्रति सहकार्य करणाऱ्या, जाहिरातदार, वाचक, पत्रकार, यांचे आभार मानले आहेत.

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक
### अनाधिकृत शाळा बंद करण्याची मागणी


शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
दिवा शहर
सचिन राम पाटील
शहरप्रमुख

प्रती,
मा. श्री. शिक्षणाधिकारी
शिक्षण समिती
ठा.म.पा.

दिनांक :-२४.१२.२०२४

सप्रेम जय महाराष्ट्र !

विषय : दिवा शहरातील अनाधिकृत शाळा कायम स्वरुपी बंद करुन त्या शाळांनच्या संस्था चालकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत....

माननीय महोदय,

[illegible]

ठा.म.पा. शिक्षण विभाग

आपला विश्वासू
सचिन राम पाटील
शहर प्रमुख

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२९, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील अनधिकृत शाळा या अनधिकृत इमारतीमध्ये सुरू आहेत. ठा.म.पा व महाराष्ट्र शासन आदी कोणत्याही प्रकारच्या शासकीय परवानगी न घेता खुलेआम मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. या अनाधिकृत शाळेमध्ये शिक्षणाचा दर्जा कितपत चांगला आहे हे सांगता येत नाही. कारण शासनाच्या कोणत्याही प्रकारचे अंकुश इथे नाही. तसेच दिवा शहरातल्या बऱ्याशा शाळेत महिला व पुरुष सुरक्षा रक्षक यांची चारित्र्य पडताळणी झालेली नाही, स्वच्छतागृह पुरेशेत सी.सी.टी.व्ही कॅमेरे चालू स्थितीत आहेत की नाही आदी कोणत्याही गोष्टीची पूर्तता न करता व कोणाचेही भय नसल्यासारखे खुलेआम सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी दिवा शहरातील स्मार्ट एज्युकेशन इंग्लिश स्कूल मध्ये घडलेला निंदनीय प्रकार पुन्हा दिवा शहरात होऊ नये. व अनाधिकृत शाळेमध्ये शिक्षणाचा दर्जा चांगल्या नसल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांच्या भविष्याचं नुकसान होऊ नये. म्हणून दिवा शहरातील अनाधिकृत शाळा कायमस्वरूपी बंद करून व त्यांच्या संस्थाचालकांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावं अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शहरप्रमुख सचिन पाटील यांनी केली आहे. प्रशासनाने येणाऱ्या काही दिवसात अनाधिकृत शाळा व त्यांच्या संस्थाचालकांवर गुन्हा दाखल केला नाही तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

## अल्पवयीन मुलीला बोटीवर नेऊन अत्याचार



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, अलिबाग :** अल्पवयीन मुलीला बोटीवर नेऊन तीच्यावर अत्याचार केल्याची घटना मुरुड तालुक्यात समोर आली आहे. या प्रकरणी २२ वर्षीय तरूणाविरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सात वर्षाची ही अल्पवयीन मुलगी तिच्या बहिण भावासह प्रातः विधीसाठी समुद्र किनारी गेली होती. यावेळी आरोपी तेथे आला, तिला फूस लावून बहिण भावांपासून दूर घेऊन गेला. नंतर तिला किनाऱ्यावर लागलेल्या एका बोटीत नेले. तिथे तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. या घटनेचा मुलीला जबर धक्का बसला. शारीरिक वेदनाही जाणवू लागल्या. त्यामुळे पिडीत मुलीने याबाबतची माहीती तिच्या आईला दिली. आईने तात्काळ पोलीस ठाणे गाठून या संदर्भातील तक्रार नोंदवली.

या मुलीच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीनंतर आरोपी आर्यन दिपक कोटकर विरोधात भारतीय न्याय संहीता आणि पॉस्को कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलीस उपनिरीक्षक एम टी शिंदे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## राज्यातील हवाई दळणवळण वाढविण्यासाठी विमानतळ प्रकल्पांच्या कामांना गती द्या - मुख्यमंत्री फडणवीस



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, ठाणे :** राज्यात पायाभूत सुविधांच्या निर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर रस्ते, जल, हवाई मार्गांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. राज्याचा प्रत्येक भाग विमानाने जोडण्यासह अस्तित्वातील विमानतळांचे विस्तारीकरण करण्याच्या कामाला गती देण्यात यावी. या कामांना केंद्र शासनाबरोबरच राज्य शासनाकडून भरीव स्वरुपाचे सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री राज्य अतिथी गृह येथे पार पडली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात हवाई वाहतुकीच्या वाढीला मोठा वाव आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या उडाण योजनेसह राज्याच्या निधीतून विमानतळांचा विकास, त्यांचे विस्तारीकण, नाईट लँडिंगची सुविधा, धावपट्टीची लांबी वाढविणे, विमानतळांवर प्रवाशांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे यासारख्या बाबींवर लक्ष केंद्रित करावे. रिलायंसच्या ताब्यात असणारी विमानतळे राज्याच्या ताब्यात घेण्यासाठी महाराष्ट्र उद्योग विकास मंडळाने तातडीने कार्यवाही करावी. मोठ्या शहरांतील विमानतळांवरील भार कमी करण्यासाठी राज्याच्या महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने युद्धपातळीवर कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रत्नागिरी, शिर्डी, अमरावती (बेलोरा), पुरंदर, कराड, चंद्रपूर (मोरवा), सोलापूर, धुळे, फलटण, अकोला, गडचिरोली या विमानतळांच्या कामांच्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा देखील घेतला. मिहान क्षेत्रांतर्गत येणाऱ्या जीएमआर नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी देण्यात येणाऱ्या ७८६.५६ हेक्टर क्षेत्रासंदर्भात करावयाच्या कराराचा आढावा घेतला. यासंदर्भातील करार लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

बैठकीस वाहतूक विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नगरविकासचे प्रधान सचिव असीम कुमार गुप्ता, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, उद्योग विभागाचे सचिव अन्बलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, नागपूरचे जिल्हाधिकारी विपीन इटनकर आदी उपस्थित होते.

## अहिल्यानगर - पुणे थेट १२५ किमी रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मान्यता
### खासदार निलेश लंके यांनी संसदेत केली होती मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, अहिल्यानगर :** अहिल्यानगर ते पुणे या थेट १२५ किलोमीटर अंतराच्या रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणासाठी केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिली आहे. हा थेट रेल्वेमार्ग झाल्यास प्रवाशांचा रस्त्याने जाताना शिरूर, शिक्रापूर, लोणी कंद येथिल वाहतूक कोंडीत वाया जाणारा दिड तासांचा वेळ वाचणार आहे.

दरम्यान, या रेल्वे मार्गामुळे अहिल्यानगरची पुणे शहराशी असणारी कनेक्टिव्हिटी वाढून उद्योग, शिक्षण क्षेत्राला चालना मिळणार आहे. अहमदनगर रेल्वे सोलापूर ऐवजी पुणे विभागाला जोडल्यामुळे पुणे कार्यालयात या सर्व्हेक्षणाबाबत डीपीआर करण्याचे काम सुरू झाले असल्याचे कळते. याबाबत खासदार निलेश लंके यांनी अहिल्यानगर - पुणे



रेल्वे सुरू करण्याबाबत संसदेत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नावर रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी अहिल्यानगर - पुणे रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत.

विशेष म्हणजे अहिल्यानगर शहरातून दैनंदिन विद्यार्थी, नोकरदार वर्ग मोठ्या संख्येने पुण्याला जातो. मात्र,रस्ते मार्गाने होणाऱ्या या अडचणीमुळे अनेक वर्षांपासूनची अहमदनगर ते पुणे थेट रेल्वेसेवा सुरू करण्याची मागणी पुढे येत होती. भविष्यात हा रेल्वेमार्ग पुर्ण झाल्यास अहिल्यानगर ते पुणे कनेक्टिव्हिटी वाढणार आहे.

> अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, देवगड, शिर्डी, शनिशिंगणापूर, रांजणगाव गणपती, शिक्रापूर, सणसवाडी, पुणे असा रेल्वेमार्ग सुरू करण्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. रेल्वेमार्ग झाल्यास धार्मिक व औद्योगिक कनेक्टिव्हिटी वाढणार असून या रेल्वे मार्गावरच तीर्थस्थळे व औद्योगिक वसाहती आहेत, त्यामुळे नव्या उद्योगांना चालना मिळेल.
>
> **-- खासदार, निलेश लंके**

प्रवाशांचा दीड तासांचा वेळ वाचणार सध्या अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील प्रवाशांना रेल्वे मार्गाने पुण्याला जाण्यासाठी दौंड वरून जावे लागते. दौंड कॉडलाईन दरम्यान डबे बदलण्यात बराच वेळ जातो. त्यामुळे तेथे प्रवाशांचा वेळ वाया जातो. रस्ते मार्गाने अहिल्यानगरहून पुण्याला जाताना शिरूर, शिक्रापूर, लोणी कंद येथे सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांना दीड ते दोन तासांचा कालावधी वाया जातो.

थेट पुणे मुंबईला शेतमाल नेता येणार सध्या शहरासह विविध कृषी उत्पन्न बाजार समितीत दाखल होणाऱ्या फळभाज्या, भाजीपाला हा शेतीमाल रस्ते मार्गाने पुणे मुंबईला जातो. मात्र वाहतूक कोंडीमुळे अनेकदा हा माल निर्धारित वेळेत पोहोचत नाही म्हणून थेट रेल्वे मार्गा झाल्यास बाजार समितीतील शेतीमाल थेट मुंबई पुण्यासारख्या बाजारपेठेत जाणे शक्य होणार आहे.

## संपादकीय



### विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची आज पुण्यतिथी आहे. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहान केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ संशोधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविशांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इस्रो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबादच्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्ष पदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना पुण्यतिथीदिनी विनम्र अभिवादन!

# नववर्षाचा संकल्प !!

**ॐ सर्वे भवन्तु सुखिनः। सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चित् दुःख भाग्भवेत ।।**

'सगळे सुखी होवोत, सगळे रोगमुक्त राहोत, सगळे चांगल्या आणि मंगल घटनांचे साक्षिदार बनोत आणि कोणाच्याच वाट्याला दुःख न येवो' असा हा या चार ओळींचा भावार्थ आपल्या प्रत्येकाला व्यापक होण्याची आणि सर्वांचे हित चिंतण्याची महान शिकवण देतो. नववर्षाचे स्वागत करताना भूतकाळातील सर्व हेवेदावे विसरून सर्वांनी हा संकल्प करायला हवा ! सामूहिक प्रार्थनेत आणि सामूहिक उपासनेत प्रचंड बळ असते. 'संघ शक्ती कलौयुगे' हा कलियुगाचा मंत्र आहे याचा अर्थ कलियुगात संघटनेतच सामर्थ्य आहे. जेव्हा एखादी प्रार्थना एकत्रितपणे समूहाने केली जाते तेव्हा त्यामध्ये संकल्पशक्ती निर्माण होते. अशी प्रार्थना फलद्रुप होण्याची शक्यता अधिक असते. सामूहिक प्रार्थनेने वातावरणात सकारात्मक स्पंदने निर्माण होतात आणि मनाला त्यातून सकारात्मक ऊर्जा मिळते. सामूहिक प्रार्थनेचे महत्व आपल्याला शालेय जीवनापासून शिकवले जाते. शाळा भरण्याच्या आरंभी विद्यार्थ्यांकडून सामूहिक प्रार्थना करवून घेतली जाते जेणेकरून निर्माण होणाऱ्या सकारात्मक ऊर्जेने विद्यार्थ्यांच्या बुद्धीवरील आवरण नष्ट होऊन शालेय अभ्यासात त्यांचे मन लागावे. अनेक संप्रदाय, संघटना आणि संस्थांमध्येही सामूहिक उपासनेचे महत्व बिंबवले जाते, इतरांकडून ती करवून घेतली जाते. एकट्याने प्रार्थना करणे आणि तीच प्रार्थना सामूहिकपणे करणे यातील परिणामकारकता भिन्न असू शकते. आपण जेव्हा एकट्याने प्रार्थना करतो तेव्हा मनातील विविध विचारांमुळे आपले मन भरकटून अन्यत्र जाऊ शकते. सामूहिक प्रार्थना करताना आजूबाजूला सर्वजण तीच प्रार्थना करत असल्याने आपले मन एकाग्र होण्यास साहाय्य होते त्यामुळे ती मनापासून होते परिणामी तिची परिणामकारकताही वाढते. कुतूहल म्हणून हा प्रयोग आपणही करून पाहू शकतो. एकट्याने आणि संघटितपणे प्रार्थना केल्यावर मनावर त्याचे काय पडसाद उमटतात हे आपण स्वतःही अनुभवू शकतो. देवाचीही आरतीही आपण एकत्रितपणे करतो त्यामुळे ती अधिक सात्विक होते. राष्ट्रगीत, देशाप्रतीची प्रतिज्ञाही आपण सामूहिकपणे घेतो. त्यामुळे यंदा नववर्षाच्या आरंभी सर्वांच्या कल्याणाकरिता सामूहिक प्रार्थना करूया !




संघटनेत बळ असते, त्यामुळे पशु पक्षी समूहाने राहतात. समूहाने वावरणाऱ्या पशु पक्ष्यांवर हिंस्र प्राणी हल्ला करताना विचार करतात. संघटनशक्तीचे महत्व बिंबवणारी काठीची आणि काठ्यांच्या मोलीची गोष्ट आपल्या लहानपणी आपण सर्वांनीच ऐकली असेल. संघटनेत सुरक्षा असते. देशातील जाती-पातीत विखुरलेल्या समाजाचा लाभ घेऊन मूठभर इंग्रजांनी आपल्य्यावर दीडशेहून अधिक वर्षे राज्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचा संकल्प केल्यावर सर्वप्रथम विखुरला गेलेला मराठा आणि हिंदू समाज एका विचाराखाली एकत्र आणण्यास सुरुवात केली. आदिलशहा, मुघल बादशहा आदींच्या दरबारात चाकरी करणाऱ्या शूरवीर मराठा योध्यांचे प्रबोधन करून त्यांना स्वराज्यात सामील करून घेतले. आज पुन्हा हिंदू समाज जाती-पातींच्या आणि पक्षांच्या विभागणीत विखुरला गेला आहे. राजकीय मंडळी आपल्या राजकीय स्वार्थासाठी समाजात जाती-पातीचे विष पेरत आहेत. धर्मनिरपेक्षतेचे नको तेव्हढे अवडंबर माजवले जात आहे. त्यामुळे आज कोणीही उठतो आणि हिंदूच्या देवतांविषयी, सण-उत्सवांविषयी, प्रथा परंपरांविषयी नको ते बोलतो, अवतारांना आणि धर्मग्रंथांना काल्पनिक म्हणून हिणवतो, हिंदूंच्या प्रथा परंपरांना अंधश्रद्धेचे लेबल चिकटवून हिंदूंना डिवचण्याचा प्रयत्न केला जातो. हिंदूची मंदिरे फोडणाऱ्या, तलवारीच्या धाकावर हिंदूंचे धर्मांतर करणाऱ्या आणि हिंदूंच्या बायाबापड्यांना नासवणाऱ्या आक्रमकांचा जाहीरपणे उदोउदो केला जातो. हिंदूंना देवतास्वरूप असणाऱ्या गोमातेच्या प्रतिदिन सर्रासपणे कत्तली केल्या जातात, हिंदूंच्या उत्सवांवर, मिरवणुकांवर बंधने आणली जातात. देशात ८० टक्के हिंदू असूनही आज हिंदूंची ही अवस्था आहे. ही स्थिती बदलण्यासाठी हिंदूंनी आज जाती-पातीची आणि पक्षांची बंधने झुगारून संघटित होणे नितांत गरजेचे आहे. हिंदू सहिष्णू आहे. विश्वबंधुत्वाची भावना त्याच्या रक्तातच आहे, त्यामळे संख्येने बहुसंख्य असूनही देशातील पंथनिरपेक्षता टिकून आहे. आज देशात सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. आदर्श राज्य म्हणून आजही जगात ;रामराज्या'ची उपमा दिली जाते. संत ज्ञानेश्वर महाराज पसायदानातून विश्वाच्या कल्याणाचे देणे भगवंताकडे मागतात. या भारतभूमीत होऊन गेलेला सर्वच संत महात्म्यांनी आपल्या अभंगांतून आणि लिखाणातून भगवंताकडे विश्वाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. विश्वकल्याणासाठी विविध यज्ञयाग आणि होमहवन करण्याची संकल्पना हिंदू धर्माच्या शिकवणुकीचाच भाग आहे. याच व्यापक शिकवणीतून आज विश्वाच्या कल्याणासाठी, विश्वातील दारिद्र्य, दुःख, निराशा नष्ट होऊन प्रत्येक जण सुखी समाधानी आणि सज्जन होण्यासाठी भगवंताकडे प्रार्थना करूया !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# नववर्षाच्या स्वागतासाठी फटाक्यांची आतषबाजी नकोच !

फटाके आणि हानी यांचे समीकरण ठरलेले असताना भारतात फटाक्यांना इतके का महत्व दिले जात आहे हे न उलगडणारे कोडे आहे. दूषित हवा आणि वाढलेले प्रदूषण यांचे डोक्यावर सावट असतानाही यंदा दिवाळीत प्रचंड प्रमाणात फटाके फोडले गेले.

परिणामी अनेक ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडल्या, श्वसन विकार असणाऱ्यांना, वृद्धांना, गर्भवती महिलांना, मुक्या प्राण्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागला. यातून लहान मुले आणि तरूणही सुटले नाहीत. न्यायालयाने दिवाळीत फटाके फोडण्याला वेळेचे बंधन घालून दिले असताना त्याची अंमलबजावणी केवळ कागदावरच राहिली. नववर्षाच्या स्वागतार्थ ३१ डिसेंबरच्या रात्री दरवर्षी देशभरात मोठ्या प्रमाणात फटाके फोडले जातात. शहरासारख्या ठिकाणी हे प्रमाण खूपच असते. मोठ्या आवाजासह धूर निर्माण करणारे फटाकेही या रात्री प्रचंड प्रमाणात फोडले जातात.



धनिप्रदूषणासह वायू प्रदूषणात भर घालणाऱ्या या आतषबाजीवर सरकारकडून अथवा न्यायालयाकडून निर्बंध का घातले जात नाहीत हाही एक प्रश्नच आहे.

भारतीय संस्कृतीचा भाग नसलेल्या फटाक्यांचा आतषबाजीला भारतात नको तेव्हढे महत्व दिले जाते. लग्न समारंभ, मिरवणूका, राजकीय सभा, यात्रा, वाढदिवस, खेळांच्या स्पर्धा, निवडणूका यांसारख्या प्रसंगी सर्रासपणे फटाके फोडले जातात. फटाक्यांच्या आवाजामुळे आणि धुरामुळे सामान्य नागरिकांसह पशु-पक्षांनाही त्रास सहन करावा लागतो.

गर्भवती स्त्रिया, लहान मुले, रुग्णाईत यांना या आतषबाजीचा अधिक त्रास सहन करावा लागतो. याशिवाय फटाके बनवणाऱ्या कारखान्यांमध्ये आणि गोदामांमध्ये वर्षभर कुठेना कुठे आगी लागून जीवित आणि वित्त हानीच्या घटना घडल्याचे वृत्त वाचनात येते. नवीन वर्षात तरी सरकार याबाबत गांभीर्याने विचार करणार आहे का ?

**- मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

### जुने कॅलेंडर..

पाय उतार झालेले
पाहिले रे सुलताना
जुने कॅलेंडर सहज
रद्दीमध्ये टाकताना

कागद रुपा भावना
गुंडाळूनि ठेवताना
कृतघ्न झालो कसे
निरोप वर्षा देताना

महत्व संपले त्याचे
मना झाल्या वेदना
साथ दिली वर्षभर
जागी ठेवी संवेदना

आनंदाचे क्षण पाहे
मनात निर्मी चेतना
सोसे वाईट घटना
जाणवल्या यातना

नवे कॅलेंडर झळके
तयार रे अभिनंदना
दिवसआले नव्यास
शोभिवंत करेसदना

कालाय तस्मै नम :
कॅलेंडर सांगते मना
अस्थिरइथले सगळे
सांभाळू कर सामना

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# हुतात्मा भाई कोतवाल पुण्यतिथीनिमित्त सिद्धगडावर विविध कार्यक्रमांचे आयोजन

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२९, मुरबाड (ठाणे) :** भारतीय स्वातंत्र्याचा अजरामर इतिहास हा प्रामुख्याने अनेक स्वातंत्र्य सैनिक आणि क्रांतिकारकांच्या बलिदानाने, त्यागाने तथा प्राणांच्या आहुतीने लिहिला गेला आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या १९४२ च्या चलेजाव आंदोलनानंतर स्वातंत्र्याच्या क्रांतीची खरी चळवळ देशभर उभी राहू लागली होती. देशभक्तीने प्रेरित होऊ देशाच्या विविध भागात भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी तरुण तरुणी स्वतःहून पुढे येऊ लागले होते. क्रांतीच्या ज्योतीचा वणवा हळूहळू उग्ररुप धारण करू लागला होता.याच दरम्यान रायगड जिल्ह्यातील माथेरान मधील नाभिक समाजाचे सुपुत्र ऍडव्होकेट विठ्ठलराव उर्फ भाई कोतवाल आपल्या सहकाऱ्यांसह क्रांतीच्या आंदोलनात सामील झाले होते.

महात्मा गांधींच्या भारतछोडो आंदोलनानंतर भाईंनी स्वतःला स्वातंत्र्याच्या आंदोलनात पूर्णपणे झोकून दिले होते.एकतर स्वातंत्र्य, नाहीतर स्वर्ग या ज्वलंत विचाराने प्रेरित झालेल्या भाई कोतवालांनी हिराजी पाटील यांच्या साथीने आझाद दस्ताच्या माध्यमातून ब्रिटिश राजवटीला सळो की पळो करून सोडले होते.शेवटी हतबल होऊन ब्रिटिश सरकारने भाई कोतवालांच्या अटकेसाठी इनाम लावला होता. अखेर फितुरीच्या विळख्यात सापडून जुलमी ब्रिटिश राजवटीशी लढताना दि.२ जानेवारी १९४३ रोजी वीर भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांना वीर मरण आले.भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या महान शुर वीरांना अभिवादन तथा श्रद्धांजली अर्पित करण्यासाठी सिद्धगड येथे दरवर्षी १ व २ जानेवारी रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.या वर्षीदेखील या थोर हुतात्म्यांच्या ८२ व्या बलिदान दिनानिमित्त सिद्धगड स्मारक समितीच्या वतीने अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले असल्याची माहिती सिद्धगड स्मारक समितीचे अध्यक्ष मा.आमदार गोटिराम भाऊ पवार यांनी दिली.

बुधवार दि.१जानेवारी रोजी संध्याकाळी ६ वाजल्यापासून वकृत्व, समुहगान स्पर्धा व विविध देशभक्ती पर कार्यक्रम रात्रभर होणार आहेत.दुसऱ्या दिवशी २ जानेवारी सकाळी ६ वाजून १० मिनिटांनी हुतात्मा ज्योत प्रज्वलित करून हुतात्म्यांना अभिवादन करून मानवंदना दिली जाणार आहे.यानंतर



ठीक आठ वाजता भव्य कुस्ती स्पर्धा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी नवनिर्वाचित वन मंत्री गणेश नाईक,माजी केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील,भिवंडीचे लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे,मुरबाडचे आमदार कथोरे,सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोद हिंदुराव,सिद्धगड स्मारक समितीचे अध्यक्ष माजी आमदार गोटीराम भाऊ पवार,ठाणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुरेश पवार यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधी,

ठाणे,रायगड,पालघर,पुणे आणि अहिल्यानगर सह महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील शेकडो देशप्रेमी नागरिक व लोकप्रतिनिधी तसेच शाळा कॉलेजचे विद्यार्थी आणि राज्यभरातील नाभिक समाज हुतात्म्यांना मानवंदना देण्यासाठी सिद्ध गडावर उपस्थित राहणार आहे.२जानेवारीला सकाळी ठीक सहा वाजून दहा मिनिटांनी हुतात्मा ज्योत प्रज्वलित झाल्यानंतर पोलीस दलाकडून हुतात्म्यांना सलामी दिली जाते.

वकृत्व स्पर्धेसाठी इयत्ता पहिली ते चौथी साठी वीर हुतात्मा भाई कोतवाल व वीर हिराजी पाटील या दोन पैकी एक तर इयत्ता पाचवी ते सातवी करीता आझाद दस्त्याचे शिलेदार किंवा क्रांतिवीर गोमाजी पाटील या दोन पैकी एक. आठवी ते दहावी साठी सिद्धगड एक अविस्मरणीय लढा किंवा सिद्धगड स्मारक स्मृती व परंपरा या दोन पैकी एक.तसेच खुल्या गटासाठी सिद्धगड लढ्यातून आम्ही काय शिकावे किंवा कोतवाल गटाच्या क्रांतिकार्याची वैशिष्टे या दोन पैकी एका विषयावर भाषण करायचे आहे. समुहगान स्पर्धा देखील याचप्रमाणे चार गटांत होणार आहेत.या विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी योगेंद्र बंगर ९३२६०५८३८३,यशवंत माळी ७०२०२७९५१०,एकनाथ देसले ९२२६८७६७९८,महेंद्र पवार ८३६९१७१५०५ यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन स्मारक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## झुनझुनवाला कॉलेजची सानिका चाळके भारतीय क्रिकेट संघात



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२९, मुंबई :** जागतिक अंडर १९ क्रिकेट चॅम्पियनशिपसाठी भारतीय संघाची निवड समितीने घोषणा केली आहे. झुनझुनवाला महाविद्यालयातील सानिका चाळके हिची संघाची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे.

सानिका ही एस.वाय.बी.कॉम डिग्री दुसऱ्या वर्षाला शिकत आहे. तिच्या या यशाबद्दल कॉलेज व्यवस्थापन, प्राचार्य आणि क्रीडा संचालक यतिन राणे यांनी तिचे अभिनंदन केले आणि स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या.

# शिंदे गटाने हिंदुत्व ८ हजारात विकले का ?

## शिवसेना ठाकरे गटाच्या रोहिदास मुंडेंचा शिंदे गटाला टोला




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२९, दिवा (ठाणे) :** शिंदे गटाच्या शहरप्रमुखामार्फत दिवा शहरात दिवा महोत्सव सुरू असून येथे मुस्लिमंना ८ हजारात व्यावसायिक स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

परिणामी हिंदुत्वावरून उद्धव साहेबांवर टीका करणाऱ्या शिंदे गटाने ८ हजार रुपयात हिंदुत्व विकलं का ? असा सणसणीत टोला शिवसेना ठाकरे गटाचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी लगावला आहे.

शिंदे गटाच्या भूमिकेवर आक्षेप घेताना रोहिदास मुंडे यांनी शिंदे गटाच्या दिवा शहरप्रमुखाच्या कृतीवर बोट ठेवले आहे. एकीकडे उद्धव साहेबांना हिंदुत्वाच्या मुद्द्यावर घेरणारे शिंदे गट स्वतः मात्र दिवा महोत्सव मध्ये पैशांसाठी मुस्लिम व्यवसायिकांना संधी उपलब्ध करून देतात यांनी केलं तर ते चालतं मात्र उद्धव साहेबांनी माणूसकीच्या दृष्टिकोनातून सर्व धर्मांना समान वागणूक दिली.

तर मात्र ते उद्धव साहेबांवर हिंदुत्व सोडण्याचा आरोप करतात. दुतोंडी भूमिका असणाऱ्या शिंदे गटाचा बुरखा दिवा महोत्सव मधील व्यावसायिक गाळे मुस्लिम व्यक्तींना ८ हजारात दिल्याने फाटला गेला असल्याचे रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.

## सर्वसामान्य कुटुंबातील मुलीने मारली सी.ए परीक्षेत बाजी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२९, कोपरखैरणे (ठाणे) :** कोपरखैरणे गावातील एका सर्वसामान्य कुटुंबातील मुलगी सी.ए परीक्षेत पास झाली. तिचं नाव हिना म्हात्रे जिद्द,चिकाटी, मेहनत आणि प्रचंड ईच्छा शक्तिच्या जोरावर अभ्यास करून शैक्षणिक क्षेत्रात बाजी मारली आहे. आई सुजाता राजकमल म्हात्रे आणी वडील राजकमल गजानन म्हात्रे या दोघांचे इच्छा पुर्ण केली. अभ्यासाच्या जोरावर हिना म्हात्रे हिने सीए (CA BCOM) या परिक्षेत यश मिळवले आहे. देशात सनदी लेखापाल (CA) ही परीक्षा सर्वात कठीण समजली जाते. या परिक्षेत कोपरखैरणे गावातील एका सर्वसामान्य कुटुंबातील हिना म्हात्रे ने कौटुंबिक प्रतिकुल परिस्थिति वर मात करून यश मिळवले आहे. १० वी पर्यंत शिक्षण ज्ञान विकास विद्यालय कोपर खैरणे तसेच १२ वी साठी व इलो उर्वरित शिक्षण साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटी (SIES Nerul) येथुन झाले आहे. अखेर उहरऑंशऑशव रलर्लेपींरपीं च्या परीक्षेत उत्तीर्ण झाली. या यशासाठी आई वडिलांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. अधिक परिश्रम घेऊन परीक्षा पास व्हायचे हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवल्याने यश गाठता आले.

अशी माहिती अविनाश पाटील यांनी दिली. हिना म्हात्रे ही सीए परीक्षा मध्ये उत्तीर्ण झाल्यामुळे कोपरखैरणे गावातील नागरिकांकडून, राजकीय नेते आणि नातेवाईक मंडळीकडून शुभेच्छांचा आणि अभिनंदनाचा वर्षाव तिच्यावर आता होत आहे. तिचा सत्कार करण्यासाठी कोपरखैरणे गावातील माजी.नगरसेवक शिवराम पाटील यांच्या समवेत ग्राम विकास मडळांचे अध्यक्ष सोपान म्हात्रे (महाराज), मोरेश्वर आगास्कर, घनश्याम पाटील, सुरेश वेटा आणि इतर पदाधिकारी तिच्या निवास जाऊन हिना म्हात्रे हिचा सर्वांनी सत्कार केला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कॅबिनेट मंत्री मकरंद पाटील यांचे महाबळेश्वर शहरात भव्य स्वागत



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२९, महाबळेश्वर (सातारा) :** वाई खंडाळा महाबळेश्वर संघाचे लोकप्रिय जननायक आमदार तथा मदत व पुर्नवसन कॅबीनेट मंत्री महाराष्ट्र राज्य नामदार मकरंद (आबा) पाटील यांचे महाबळेश्वर येथे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी जेसीबी च्या सह्याने पुष्प वृष्टी करून फटाक्याच्या आतिषबाजीत स्वागत करण्यात आले. जागो जागी अभिंनदनाच्या स्वागत कमानी व फलेक्स उभारण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातून ढोल ताशाच्या गजरात भव्य असी रॅली काढण्यात आली. मंत्री साहेबांच्या लाडक्या बहिणींनी औक्षण केले. मुख्य बाजारपेठेत व्यापारी वर्गाने स्वागत केले. सुभाष चौक येथे विविध संघटना, पतसंस्था, महाबळेश्वर नगरपालिका, व्यापारी वर्ग, पत्रकार संघ व स्थानिक नागरिकांनी बुके शाल श्रीफळ देऊन मकरंद आबांचे अभिनंदन केले. यावेळी किसन शिंदे, उपनगराध्यक्ष अफजल सुतार, नगरसेवक नासीर भाई मुलाणी प्रकाश पाटील, आबा शिंदे, रवी कुंभारदरे, महेश कोमटी,विमल पारठे, विमल ओंबळे, उषा ओंबळे, विजय नायडू सचिन गुजर, शरद बावळेकर, सतीश ओंबळे, ॲड.संजय जंगम, विशाल तोष्णीवाल, संदीप सांळुखे, मुबारक पटेल, फकिर वलगे, प्रशांत भोईटे, राजेंद्र पवार, जावेद वलगे, किरण शिंदे, तौफीक पटवेकर, सुनिल ढेबे , गौरव राक्षे, उमेश रोकडे तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजपा, शिवसेना पक्षाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते, महाबळेश्वरातील प्रतिष्ठित नागरिक व विशाल जनसमुदाय उपस्थित होता.

## एसटीच्या जागेचा मीरा-भाईंदर महापालिकेद्वारे विकास होणार



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२८, मिरा-भाईंदर (ठाणे) :** एसटीच्या भाईंदर पश्चिम येथील जागेचा मीरा-भाईंदर महापालिकेच्या माध्यमातून विकास करण्यात येणार असून या प्रकल्पांतर्गत भव्य असे वातानुकूलित मच्छी मार्केट बनविण्यात येणार आहे. याबरोबरच परिवहन विभागाचे उपप्रादेशिक कार्यालय देखील या इमारतीतून सुरू करण्यात येणार असून रेल्वेच्या प्रवाशांना पे ॲड पार्कची देखील सुविधा या प्रकल्पामध्ये करण्यात येईल. अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी त्यांच्या सोबत परिवहन विभागाचे आयुक्त विवेक भीमनवार, मीरा- भाईंदर महापालिकेचे आयुक्त संजय काटकर व एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर हे अधिकारी उपस्थित होते. एसटी महामंडळ, परिवहन विभाग व मीरा- भाईंदर महापालिकेच्या वरिष्ठ अधिकारी यांची बैठक घेतल्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना ते पुढे म्हणाले की, सन १९८६ पासून अविकसित असलेल्या भाईंदर- पश्चिम येथील एसटीच्या सुमारे ७४०० चौरस मीटर जागेचा विकास मीरा-भाईंदर महापालिकेच्या माध्यमातून करण्यात येणार असून या प्रकल्पामध्ये ५० टक्के जागा एसटी महामंडळाला उर्वरित ५० टक्के जागा ही महापालिकेला वापरण्यासाठी उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पामध्ये एसटीच्या ९ मीटर आकाराच्या इलेक्ट्रिक बसचे आगार व बसस्थानक, परिवहन विभागाचे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आणि महापालिकेतर्फे सुमारे ३० हजार चौरस मीटर क्षेत्रावर वातानुकूलित मच्छी मार्केट तयार करणे, प्रस्तावित आहे. या एकूण प्रकल्पाचा खर्च सुमारे १३६ कोटी असून हा खर्च मीरा- भाईंदर महापालिका व राज्य शासन संयुक्तपणे उचलणार आहेत.यावेळी बोलताना मंत्री सरनाईक यांनी राज्यातील सर्व महापालिका क्षेत्रामध्ये यापुढे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्यात येईल, अशी घोषणा केली.

महापालिका क्षेत्रामध्ये लोकसंख्या झपाट्याने वाढत असून त्या लोकसंख्येचा विचार करता प्रत्येक महापालिका क्षेत्रामध्ये एक उपप्रदेशिक कार्यालय असावे, या मागणीला जोर धरला होता. त्यामुळे भविष्यात जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन परिवहन संबंधित कामे करण्याची महापालिका क्षेत्रातील सर्वसामान्य जनतेला तसदी घ्यावी लागणार नाही. ती सर्व कामे आता महापालिका क्षेत्रामध्ये त्यांना करणे शक्य होणार आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले.

मीरा- भाईंदर येथील उत्तन येथे महसूल विभागाकडून परिवहन विभागाला हस्तांतरित होणाऱ्या ९७०० चौरस मीटर जागेवर स्वयंचलित संगणकीय वाहन चाचणी केंद्र उभारण्यात येणार असून त्या जोडीला स्वयंचलित वाहन चालक चाचणी मार्ग देखील उभारला जाणार आहे. अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली अशी चाचणी केंद्रे राज्यभरात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी उभारण्यात येणार असल्याचा धोरणात्मक निर्णय या वेळी घेण्यात आला.

एका प्रवाशाने मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे एसटीचे संगणकीय आरक्षण केंद्र हे दुपारी ३ वाजेपर्यंतच उघडे असते, संध्याकाळी येणाऱ्या प्रवाशांना संगणकीय आरक्षण केंद्रावर तिकीट उपलब्ध होत नाही, अशी तक्रार केली. यावेळी उपस्थित असणाऱ्या एसटी अधिकाऱ्यांना तिथेच आदेश देऊन आजपासूनच सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत संगणकीय आरक्षण केंद्र सुरू ठेवण्याचे आदेश मंत्री सरनाईक यांनी दिले.

## नागपूरात गच्चीवरील भाजीपाला लागवड कार्यशाळा संपन्न




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, नागपूर :** अँग्रोव्हिजन फाउंडेशन तर्फे गच्चीवरील भाजीपाला लागवड या विषयावर एक दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा नागपुरात नुकतीच आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे सल्लागार, प्रसिद्ध कृषि शास्त्रज्ञ, परभणी कृषि विद्यापिठाचे माजी कुलगुरु डॉ.सी. डी.माई, कॅप्टन डॉ. एल.बी. कलंत्री यांची प्रामुख्याने विशेष उपस्थिती होती. समग्र विकास क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार व द्वीप प्रज्वलन करुन कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून वसंतराव परसबागेचे निर्माते ज्ञानप्रकाश लोकसंस्थेचे श्रीपत राठोड व जयश्री राठोड तसेच कु.अंजली व कु. दिपाली राठोड यांची उपस्थिती होती.

कार्यशाळेत दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या आरोग्याच्या गंभीर समस्येवर गट चर्चा झाली. पावर पाईंट सादरीकरणातून अनेक महत्वपूर्ण मुद्दे सहभागीतांच्या मनावर बिंबविण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला. तसेच प्रत्यक्ष थेट इमारतीच्या चौथ्या मजल्यावर साकारलेल्या वसंतराव नाईक परसबागला भेट देऊन गच्चीवरील भाजीपाला लागवडी संबंधित सर्व तांत्रिक व शास्त्रीय माहिती चर्चात्मक पद्धतीने देण्यात आली. घरच्या घरी रोज आपल्याला लागणारा विषमुक्त ताज्या भाजीपाला उत्पादन काढण्यासंबंधी सविस्तर मार्गदर्शन करून सर्व प्रशिक्षणार्थींचे प्रश्न व शंका समाधान करण्यात आले. प्रशिक्षणाला सर्व वयोगटातील प्रशिक्षणार्थी उत्स्फूर्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रामुख्याने युवक युवतींचा अधिक सहभाग होता हे विशेष. सर्व सहभागीतांना ज्ञानप्रकाशचे श्रीपत राठोड आणि जयश्री राठोड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी ॲग्रोव्हिजनचे कमलेश थलाल व भूषण वंजारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सततच्या लहरी हवामानामुळे शेतकरी मेटाकुटीला

# कांदा, हरभरा, गहू पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, अहिल्यानगर :** जिल्ह्यात सततच्या ढगाळ हवामान आणि दाट धुक्यामुळे कांदा पीक संकटात सापडले आहे. पारनेर तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकर्यांनी खबरदारीचा उपाय म्हणून कांदा पिकावर औषध फवारणी सुरू केली आहे. अगोदरच कांदा रोपे, मजूरटंचाई; त्यात आता महागड्या औषध फवारणीमुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

रब्बी हंगामात तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर, निघोज, कान्हुरपठार,भाळवणी, ढवळपूरी, जामगाव, पिंपळगाव रोठा, पोखरी खडकवाडी पळसपूर ,काकणेवाडी, कासारे, सावरगाव, वासुंदे आदी परिसरात कांदा पीक मोठ्या प्रमाणावर शेतकर्यांनी घेतले आहे. यंदा कांद्यांना बाजारभाव देखील चांगले मिळाले आहे. त्यामुळे लागवड क्षेत्रात देखील मोठी वाढ झाली आहे.

यंदा कांदा लागवडीसाठी रोपांचा तुटवडा निर्माण झाला. परतीच्या पावसाचा फटका कांदा रोपांना बसला होता. त्यानंतर कांदा लागवडीसाठी मजूर मिळत नव्हते. शेतकर्यांनी जादा मजुरी देऊन कांदा लागवडींची कामे पूर्ण करून घेतली. आता कांदा पीक एक महिन्याचे झाले आहे.

परंतु, आता निसर्गाच्या लहरीपणाचा फटका कांदा, गहू, हरभरा पिकाला बसू लागला आहे. सततचे ढगाळ हवामान, दाट धुक्यामुळे कांदा , गहू पिकावर मावा, करपा, रसशोषित किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कांद्याच्या पातींना पीळ पडला आहे. त्यामुळे किडीरोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतकर्यांनी कांदा पिकावर महागड्या औषधांची फवारण्या केल्या जात आहेत.

## नमन लोककला संस्थेच्या वतीने आमदार शेखर निकम यांना शुभेच्छा



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२९, दादर (मुंबई) :** मागील हिवाळी अधिवेशनात नमन लोककला संस्थेच्या मागण्या अधिवेशनात लक्षवेधी करणारे चिपळूण संगमेश्वर मतदारसंघाचे विद्यमान आमदार शेखर निकम तिसऱ्यांदा आमदार पदी विराजमान झाल्या प्रति रविवार, दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी मुंबई - दादर येथील आयोजित नागरिकांचा संवाद मेळावा झाला. दरम्यान नमन लोककला संस्था कार्यक्षेत्र (भारत) संस्थेच्या वतीने शुभेच्छा देत दि.०५जानेवारी २०२५ रोजी चिपळूण येथे संपन्न होणाऱ्या जागर नमन लोककलेचा सन्मान लोककलावंतांचा २०२४-२५ ह्या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण देताना अध्यक्ष रविंद्र मटकर, सचिव सुधाकर मास्कर, तुषार पंदेरे, उदय दणदणे, प्रशांत भेकरे, सुभाष बांबरकर आदी सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.

अक्षराज

४ बुलडाणा, सोमवार, दि.३० डिसेंबर २०२४ संमिश्र

# सावित्री-ज्योती महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी किशोर डागवले यांची नियुक्ती

## सावित्री ज्योती महोत्सवातून महिला सशक्तीकरणाना चालना - किशोर डागवाले

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, अहिल्यानगर :** शहरातील सावेडीत ९ ते १२ जानेवारी दरम्यान होणाऱ्या सावित्री ज्योती महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी मनपाचे माजी सभागृह नेते किशोर डागवाले यांची नियुक्ती करण्यात आली. संयोजन समितीच्या वतीने त्यांना नियुक्तीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सावित्री ज्योती संयोजन समितीचे प्रमुख संयोजक ॲड. महेश शिंदे, राजकुमार चिंताम णी, शीनिवास नागुल, विनोद साळवे, बाळासाहेब पाटोळे, आरती शिंदे, ब्युटीशियन सुमय्या शेख, ॲड. सुनील सूर्यवंशी, नितीन डागवले, प्रकाश डोम कावळे, समीक्षा कुलकर्णी आदी उपस्थित



होते. दरवर्षीप्रमाणे सावेडी येथील कोहिनूर मंगल कार्यालयात जय युवा अकॅडमी, जिल्हा क्रीडा कार्यालय, महापालिका, नेहरू युवा केंद्र, जय असोसिएशन ऑफ एनजीओ (महाराष्ट्र राज्य), जिल्हा रुग्णालय, समाजकार्य महाविद्यालय, इंडो आयरीश हॉस्पिटल आदींच्या सहकार्याने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. किशोर डागवाले म्हणाले की, सावित्री ज्योती महोत्सवातून महिला सशक्तीकरणाना चालना दिली जात आहे. महिला वर्गांसाठी ही एक पर्वणी, तर बचत गटातील महिलांना बाजारपेठ उपलब्ध होत आहे. गेल्या नऊ वर्षापासून सुरु असलेली ही सामाजिक चळवळ जनजागृतीचे देखील सक्षमपणे कार्य करत आहे. तर विविध सामाजिक उपक्रमांतून गरजूंना आधार दिला जात आहे. अशा लोकचळवळीतून निर्माण झालेल्या सावित्री ज्योती महोत्सवाचे स्वागताध्यक्षपद भूषविताना अभिमान वाटणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

डागवाले यांचे सामाजिक चळवळीतील योगदान मोठे किशोर डागवले गेल्या ३० वर्षापासून राजकारणात सक्रीय राहून समाजकारणात कार्यरत आहे. शिववरद प्रतिष्ठानच्या माध्यमातून गणेशोत्सव, नवरात्रोत्सव व हळदी - कुंकू कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे कार्य ते सातत्याने करत आहे. तसेच विविध सामाजिक उपक्रमांद्वारे गरजूंना आधार देण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला आहे. बचत गटातील महिलांसाठी मार्गदर्शन मेळावे व इतर उपक्रम सुरू आहेत. या सामाजिक चळवळीतील एक घटक असलेल्या डागवाले यांची सर्वानुमते स्वागताध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

**-- ॲड. महेश शिंदे**

# थोडक्यात

## पहिल्याच प्रयत्नात सी.ए होऊन सानिकाने घडवली शैक्षणिक क्रांती

**अक्षराज : विकास दळवी**



**दि.२९, भांडुप (मुंबई) :** नुकताच सी.ए परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये भांडुपची (मूळ गाव बिभवी तालुका जावली जिल्हा सातारा) रहिवासी असलेली कै.तुकाराम बळवंत बर्गे यांची नात कु.सानिका संजना प्रदीप बर्गे हिने पहिल्याच प्रयत्नात सी.ए होऊन शैक्षणिक क्रांती घडविली. लहानपणापासून अभ्यासात हुशार असलेल्या सानिकाचा दहावीपर्यंतचा शैक्षणिक प्रवास इंग्रजी माध्यमातून नॅशनल हायस्कूल भांडुप येथे झाला. इयत्ता दहावीतच सानिकाने ९४ टक्के गुण मिळवून शैक्षणिक क्षेत्रात गरुड भरारी घेण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. सानिकाने पदवीपर्यंतचे शिक्षण पोद्दार महाविद्यालय मांटुगा येथून घेतले. सानिका बर्गे हिने सी.ए होण्याचे स्वप्न पहिल्याच प्रयत्नात अथक परिश्रम घेऊन पुर्ण केले. प्रचंड इच्छाशक्ती आणि अफाट जिद्दीच्या जोरावर यश मिळविता येते हे सानिकाने दाखवून दिले आहे. आई, वडील, भाऊ, आजी, आजोबा, आत्या, मामा माझ्या यशाचे मानकरी असल्याचे सानिका आवर्जून सांगते. सानिकाच्या या यशाबद्दल तिच्यावर विविध स्तरातून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सामाजिक ऐक्य, भाईचाराचे प्रतीक असलेल्या संदलने वेधले लक्ष !

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२९, नांदेड :** बिलोली येथे झालेले नवाब सरफराज खान यांची संदल म्हणजे सामाजिक ऐक्य व भाईचाराचे प्रतीक असल्याचे येथील संदलची गुरुवारी निघालेली मिरवणूक ही अत्यंत लक्षवेधी ठरली असून सामाजिक सलोखा बिघडू पाहणाऱ्या प्रवृत्तीच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी ठरली आहे.

बिलोली शहरातील देशमुख नगर येथे गेल्या अनेक वर्षांपासून यांची संदल निघते. येथील संदल आयोजित करणाऱ्या मंडळींना या प्रभागात गेल्या दहा वर्षापासून न. प. ची स्वप्न घेऊन अखंड परीश्रम घेणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते वलीओद्दीन फारुखी यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन असते.येथे



दिनांक २६ डिसेंबर गुरुवारी रोजी प्रति वर्षाप्रमाणे संदल आयोजित करण्यात आली. या संदल निमित्त बिलोली शहरातून भव्य -दिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. वेगवेगळ्या जाती - धर्मातील पंथातील युवक हिरवे झेंडे घेऊन यात सहभागी झाले होते. ढोल ताशांच्या गजरात शहरातील मुख्य रस्त्याने निघालेली ही मिरवणूक अत्यंत लक्षवेधी ठरली . बिलोलीतल्या या संदल चे वैशिष्ट्य म्हणजे येथे सर्व जाती धर्माचे युवक अगदी आनंदात नृत्य करीत या मिरवणुकीमध्ये सहभागी होतात.

हिंदू मुस्लिम सामाजिक ऐक्याचे आणि भाईचाराचे प्रतीक म्हणुन या संदलकडे पाहीले जाते. गेल्या अनेक वर्षांपासून येथेही परंपरा चालवली जाते. हा संदल कार्यक्रम शेख अख्तर, गुड्डू पटेल, दत्तू कंकनवाड, शेख वहाब, शेख सोहेल, शेख जुबेर, शहबाज पठाण, शेख शाकीर, श्रीकांत कंकणवाड, सचिन आठवले, शिवा गायकवाड, शेख सम ीर,शेख मुस्ताक, बळीराम लांडगे, शेख फिरोज, अदनान मिर्झा, इरफान मिर्झा, शेख रफिक, पाशा कुरेशी, नजीर कुरेशी उजेब कुरेशी आदींनी हा कार्यक्रम घडून आणला. पोलीस निरीक्षक अतुल भोसले यानी चोख बंदोबस्त ठेऊन हि मिरवणूक शांततेत पाडली.

## जि.प.शिपोळे नं.१ शाळेचे इस्रो/नासा चाळणी परीक्षेत सुयश

### कौशल विलास पवार याची जिल्हास्तर परीक्षेसाठी निवड

**अक्षराज : उमेश तबीब**



**दि.२९, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुक्याच्या उमरोली केंद्रातील शिपोळे नं.१ शाळेने जि. प.रत्नागिरी पुरस्कृत इस्रो/नासा तालुकास्तरीय निवड चाळणी परीक्षेत उज्वल यश मिळवले असून शाळेतील इयत्ता ७ वी तील विद्यार्थी कौशल विद्या विलास पवार याची जिल्हास्तरीय परीक्षेसाठी निवड झाली आहे. सुरुवातीला उमरोली केंद्रात पार पडलेल्या प्राथमिक फेरीतील परीक्षेत इयत्ता ५ ते ७ वी तील एकूण ४८ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यात ३८ गुणांसह कौशल पवार याने अव्वल स्थान पटकावले. त्यानंतर मंडणगड तालुकास्तरीय परीक्षेत ७८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या परीक्षेत ३७ गुण मिळवत त्याने गुणानुक्रमे पहिल्या १० विद्यार्थ्यांत स्थान मिळवले. त्याच्या या यशाबद्दल त्याचे वर्गशिक्षक आणि शाळेचे मुख्याध्यापक शरद जगताप आणि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा प्रवीण घोसाळकर यांनी अभिनंदन केले आहे. शाळेचे पदवीधर शिक्षक पुंडलिक शिंदे आणि उपशिक्षिका शशिकला चौधरी/कोकणी यांनीही शुभेच्छा देऊन कौतुक केले.


# दिवा प्रभाग समिती अंतर्गत फेरिवाल्यांकडून होणाऱ्या त्रासाबाबत निवेदन

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२९, दिवा :** शिळ-डायघर-देसाई-दहिसर विभागातील दक्ष नागरीक संघटनेने दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी सहाय्यक आयुक्त, दिवा प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिकेच्या कार्यालयाला निवेदन सादर केले. या निवेदनात मुंब्रा-पनवेल रस्त्यावरील भारतगिअर्स बायपास ते कल्याणफाटा जंक्शन आणि शील-म हापे रस्त्यावरील अनधिकृत फेरिवाले आणि वाहन पार्किंगमुळे निर्माण झालेल्या समस्यांवर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांच्या चालण्यासाठी असलेले फुटपाथ फेरिवाले आणि इतर धंदेवाले व्यापत आहेत, ज्यामुळे नागरिकांना मुख्य रस्त्यावरून चालण्याची वेळ येते. हॉटेलवाले व रस्त्यालगत धंदा करणाऱ्यांची समस्याअनेक हॉटेलवाले रस्त्यालगत टेबल-खुर्च्या मांडून ग्राहकांना रस्त्यावरच बसवतात.

यामुळे वाहतुकीस अडथळा निम ार्ण होतो.अनधिकृत बांधकामांचे वाढते प्रमाण या परिसरात अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणावर वाढत असून, यामुळे पाणीपुरवठा, नाले साफसफाई, रस्ते आणि अन्य मूलभूत सुविधा अपुऱ्या पडत आहेत.दक्ष नागरीक संघटनेने कुर्ला परिसरातील बस अपघाताची आठवण देत, अशा दुर्घटना दिवा परिसरात घडू नयेत



दक्ष नागरीक संघटना

शिळ-डायघर-देसाई-दहिसर विभाग

दि.26/12/2024

प्रति,
मान. सहाय्यक आयुक्त साहेब,
प्रभाग समिती कार्यालय,
दिवा.

दिवा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे
आवक क्र. 6226
दिनांक 26/12/24

विषय : दिवा प्रभाग समिती अंतर्गत फेरिवाल्यांकडून होणाऱ्या त्रासाबाबत. . . .

महोदय,

आम्ही आपल्या निदर्शनास आणू ईच्छितो की आपल्या कार्यक्षेत्रातील मुंब्रा पनवेल रस्त्यातील भारतगिअर्स बायपास ते कल्याणफाटा जंक्शन पर्यंत व शीळ-महापे रोड च्या परिसरातील पूर्ण रस्त्यात अनधिकृतपणे वाहनांची पार्कींग, रस्त्यालगत असलेले हॉटेलवाल्यांच्या टेबल-खुर्च्या भररस्त्यात मांडुन गिऱ्हाईक बसवले जातात तसेच पूर्ण रस्त्यातील फुटपाथ फेरिवाले व इतर धंदेवाले असे धंदा लावून बसतात की जणू हे फुटपाथ महापालिका लोकांना चालण्यासाठी नव्हे तर यांना धंदा लावण्यासाठी बनवते.

आणि आपल्या महापालिकेचे अधिकारी देखिल अगदी जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करतात. आपल्याला आत्ताच मुंबईतील कुर्ला येथिल बस अपघाताची घडलेली घटना लक्षात असेलच, तरी अशी दुर्घटना आपल्या हद्दीत घडू नये यासाठी आम्ही या सर्व बाबी आपल्या निदर्शनास आणून देत आहोत.

तसेच परिसरात अनधिकृत बांधकामांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसत आहेत. आपले कर्मचारी त्याकडे देखिल दुर्लक्ष करीत आहेत. यामुळे परिसरात पाणी, नाले, रस्ते अशा प्रकारच्या सुविधा अपुरे पडण्यास अनधिकृत बांधकामे कारणीभूत ठरत आहेत.

तरी याकडे आपण स्वत: लक्ष घालून याबाबतीत योग्य ती कार्यवाही कराल ही

म्हणून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी ठाणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून याकडे होत असलेल्या दुर्लक्षावरही आक्षेप घेतला आहे.संघटनेने सहाय्यक आयुक्तांनी स्वतः लक्ष घालून अनधिकृत फेरिवाल्यांवर आणि बांधकाम ांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. यामुळे नागरिकांना मूलभूत सुविधा सुरळीतपणे मिळतील व वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

नागरिकांनी या निवेदनावर सह्या केल्या असून, यामध्ये सुषमा भोईर, संतोष सुदाम, शरद गुणाजी पाठीव, विनोद शनिवार वारकर, करण सोग्या खारपाठीव यांचा समावेश आहे. दिवा प्रभाग समि तीकडून यावर ठोस उपाययोजना होईल, अशी अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली आहे.

## गैरप्रकार करणाऱ्यांवर कायद्याचा बडगा

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**



**दि.२९, कल्याण (ठाणे) :** गेल्या काही दिवसापासून कल्याण डोंबिवली हद्दीमध्ये गुन्हेगारी वाढ झाल्याने पोलीस सतर्क झाले. पोलीस उपायुक्त परिमंडल ०३ मधील पोलीस ठाणे मध्ये काही गुन्ह्याची नोंद व तक्रार प्राप्त होत असून पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी शनिवारी रात्री रामनगर, विष्णूनगर , टिळकनगर, मानपाडा कोळसेवाडी, महात्मा फुले, खडकपाडा आणि बाजारपेठ पोलीस ठाणे यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंमलदारांनी बिना परवाना जास्त वेळ अस्थापना चालू ठेवणं, सार्वजनिक ठिकाणी आरडाओरडा करून शांतता भंग करणे, वाहतुकीला अडथळा, सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे, गावठी दारू विक्री, सार्वजनिक ठिकाणी गांजा पिणे, त्याचबरोबर रस्त्यांना अडवून अनधिकृत फेरीवाले अश्या १७० जणांवर कारवाई करण्यात आली.

# दक्षिण आफ्रिका WTC फायनलमध्ये

सेंच्युरियन कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानचा २ विकेट्सनी जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. दक्षिण आफ्रिका अंतिम फेरीत पोहोचणारा पहिला संघ ठरला आहे. सुपरस्पोर्ट्स पार्क येथे खेळल्या गेलेल्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेसमोर केवळ १४८ धावांचे छोटे लक्ष्य ठेवले होते. दक्षिण आफ्रिकेने १५० धावा करत सामना जिंकला. दक्षिण आफ्रिकेच्या या विजयात एडन मार्करम आणि रबाडा-यान्सन जोडीने महत्त्वाची भूमिका बजावली.

**दक्षिण आफ्रिका WTC फायनलमध्ये दाखल –**

सुपरस्पोर्ट्स पार्क येथे खेळल्या गेलेल्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानने पहिल्या डावात २११ आणि दुसऱ्या डावात २३७ धावा केल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ३०१ धावा आणि दुसऱ्या डावात १५० धावा करत




सामना जिंकला. वेगवान गोलंदाजांना विकेटवरून मिळत असलेल्या मदतीमुळे यजमानांना माफक लक्ष्यही गाठताना संघर्ष करावा लागला. मात्र, शेवटी मार्को यान्सेन (२४ चेंडूत १६ धावा) आणि कागिसो रबाडा (२६ चेंडूत ३१ धावा) यांनी नवव्या विकेटसाठी ५० चेंडूत ५१ धावांची नाबाद भागीदारी करत दक्षिण आफ्रिकेला ऐतिहासिक विजय मिळवून दिला.

दमदार फलंदाजीच्या जोरावर, दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना दोन गडी राखून जिंकला आणि आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिप २०२५ च्या अंतिम फ ेरीत आपले स्थान निश्चित केले. श्रीलंकेविरुद्ध घरच्या मैदानावर २-० अशी मालिका जिंकल्यानंतर प्रोटीज संघ आधीच डब्ल्यूटीसी गुणतालिकेत अव्वल स्थानावर होता. सध्याच्या हंगामात ११ कसोटी खेळलेल्या दक्षिण आफ्रिकेकडे ७ विजयांसह ६६.६७% पीसीटी आहे.

सध्याच्या डब्ल्यूटीसीच्या हंगाम ातील दक्षिण आफ्रिकेचा प्रवास पाहिला तर त्याची सुरुवात घरच्या मैदानावर भारताविरुद्ध अनिर्णित मालिकेने झाली होती. यानंतर न्यूझीलंडविरुद्ध क्लीन स्वीपचा सामना करावा लागला. मात्र, विंडशात वेस्ट इंडिज आणि बांग्लादेशविरुद्ध दणदणीत विजय मि ळवून प्रोटीज संघाने दमदार पुनरागमन केले. यानंतर घरच्या मैदानावरही चम कदार कामगिरी केली. टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखालील संघ पुढील वर्षी लॉर्ड्स येथे अंतिम फेरीसाठी पात्र ठरणारा पहिला संघ ठरला. दक्षिण आफ्रिका संघाने फायनलचे प्रबळ दावेदार असलेले ऑस्ट्रेलिया, भारत आणि श्रीलंकेला मागे टाकत सर्वांना चकित केले. आता संपूर्ण क्रिकेटविश्वाला दुसऱ्या फायनलिस्ट कोण असणार याची उत्सुकता लागली आहे.

## डोंबिवली वाहतूक शाखेची नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनावर कडक कारवाई

**अक्षराज : भानुदास गायकवाड**



**दि.२९, डोंबिवली (ठाणे) :** वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दि.२८ रोजी संध्याकाळी डोंबिवली वाहतूक शाखेतर्फे दंडात्मक कारवाई करण्यात आली वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी डोंबिवली वाहतूक शाखेने कडक मोहीम हाती घेतली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील आणि पोलीस उपनिरीक्षक गोपीनाथ आढाव यांच्या नेतृत्वाखाली इंद्र चौक आणि रेल्वे स्थानक परिसरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर विशेष कारवाई करण्यात आली. प्रवाशांच्या सुरक्षेला धोकादायक ठरू शकणाऱ्या ओवर सीट रिक्षांवर तसेच विनागणवेश रिक्षा चालवणाऱ्या चालक तसेच रिक्षाचालकांच्या नियम पालनाची तपासणी करून अनेक रिक्षांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

वाहतुकीचे इतर उल्लंघन व विनाहेल्मेट दुचाकी चालवणे आणि वाहतुकीस धोका निर्माण करणाऱ्या इतर नियमांच्या उल्लंघनांवर देखील विशेष लक्ष देण्यात आल्याचे दिसले सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांनी सर्व नागरिकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

त्यांनी विशेषत: वाहनचालकांनी हेल्मेटचा वापर अनिवार्यपणे करावा, वाहतूक नियम मोडू नयेत आणि सुरक्षित प्रवास सुनिश्चित करावा, असे सांगितले. नववर्ष स्वागताच्या धामधुमीत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी डोंबिवली वाहतूक शाखेने विशेष लक्ष दिले असल्याचे दिसूनआले , नियम तोडणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई होणार असून नागरिकांनीही यामध्ये सहकार्य करावे आणि सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असा संदेश सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांनी दिला आहे.